# अण्णा X परुळेकर

## अण्णांच्या अविश्वासानंतर राजू परुळेकर नाराज?

मुंबई - माझ्यावर अण्णांनी अविश्वास दाखवल्यामुळे आपण नाराज असल्याचे मत लेखक, पत्रकार राजू परुळेकर यांनी सोशल नेटवर्किंग साइट ब्लॉगवर व्यक्त केले आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी शुक्रवारी दिल्लीतल्या राजघाटावर मौन सोडल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधला होता. त्यावेळी ब्लॉगवरील पत्राबद्दल

राजूने स्वत:च्या मनाने काही लिहिले आहे का याची चौकशी करतो, असे बोलून परुळेकर यांच्यावर अविश्वास दाखवला होता.

जनतेशी इंटरनेटच्या माध्यमातून संवाद साधण्यासाठी अण्णांनी ब्लॉगचा वापर करण्याचा निश्चय घेतला होता. अण्णांचे ब्लॉग अपलोड करण्याची जबाबदारी राजू परुळेकर यांच्याकडे होती.

असलेल्या एका ब्लॉगमुळे अण्णांच्या विधानानंतर राजू परुळेकर नाराज असल्याचे कळते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, परुळेकर म्हणतात की, मी अण्णा हजारे यांचेच विचार त्यांच्या ब्लॉगद्वारे मांडले आहेत. माझ्या मनाचे काहीही त्यात लिहिलेले नाही. मला अण्णांनी जे लिहून दिले तेच मी मांडले आहे. याविषयी शंका असल्यास माझ्याकडे

असे स्पष्टीकरण त्यांनी दिले. कोअर कमिटीत बदल करण्याचा अण्णांचा विचार सुरू होता. तसे त्यांनी पत्रात लिहून दिले होते, पण त्यांचे सहकारी सुरेश पाठारे यांनी ते पत्र प्रसिद्ध करू नये असे सांगितले होते, असेही त्यांनी सांगितल्याचे समजते. दरम्यान, टीम अण्णाला याबद्दल विचारले असता या पत्राबद्दल अण्णा लवकरच खुलासा करतील, असे सांगण्यात